# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७, ई-मेल आयडी-11thonlineadmissiondydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी/पुवि/२०१८/ ४५०८

दिनांक :- 20 JUN 2018

प्रति,

सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/वरिष्ठ महाविद्यालय सलग्न,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी शाळा सोडल्याचा दाखला व ऑनलाईन गुणपत्रिकेच्या आधारे बायफोकल (द्विलक्षी) प्रवेश देणेबाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ चे कामकाज पुणे व पिंपरी चिंचवड, या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. शासन स्तरावरुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेशाचे कामकाज सुरु आहे.

सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना आदेशित करण्यात येते की, जे विद्यार्थी बायफोकल (द्विलक्षी) प्रवेशासाठी किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन गुणपत्रकाच्या आधारे दाखला मागणी करत असतील अशा सर्व विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचा दाखला त्वरीत देण्याची कार्यवाही करण्यात यावी. शाळा सोडल्याच्या दाखल्या अभावी एखाद्या विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याधापकांची राहील.

सर्व उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, ऑनलाईन गुणपत्रक व सोबत असलेल्या मुळ शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार इ. ११ वी चे ऑनलाईन प्रवेश कायम करण्यात यावेत. याबाबत कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसचांलक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे



Scanned by CamScanner